**PERSONAL COPY**

NOT FOR SALE OR CIRCULATION

ISO 9001-2015

# LAKSHYA CAREER ACADEMY

# शालेय पुस्तके – भाग –१
# School Books - Part - 1


## लक्ष्य करिअर ॲकेडमी

**FOR MPSC (राज्यसेवा) & PSI, STI, ASO**

7887878001 / 7887878002

/groups/77926463145586

www.thelakshyaacademy.in

lakshyacareeracademynashik@gmail.com

पत्ता : श्रीनाथ अपार्टमेंट, मुरकुटे लायब्ररी समोर, लेन नं.३, पंडीत कॉलनी, नाशिक–२

लक्ष्य करिअर अकॅडमी

**For**

**MPSC**

*(राज्यसेवा व* **PSI, STI, ASO***)*

# शालेय पुस्तके – भाग – १

# School Books - Part - 1

ISO 9001-2015


* लेखक *

श्री. अतुल निकुंभ

* संपादक *

लक्ष्य करिअर अकॅडमी

# शालेय पुस्तके - भाग - १
# School Books - Part - 1


प्रकाशक

**लक्ष्य करिअर अकॅडमी**

**For MPSC (राज्यसेवा व PSI, STI, ASO)**



पत्ता : श्रीनाथ अपार्टमेंट, मुरकुटे लायब्ररी समोर, लेन नं.३, पंडीत कॉलनी, नाशिक-२

Phone No : **7887878001 / 7887878002**

Email : lakshya career academy nashik@gmail.com

.Facebook : https://www.facebook.com / groups / 77926463145586



○ **लक्ष्य करीयर अकॅडमी**

○ **मुद्रणस्थळ**
नाशिक

○ **आवृत्ती :**
प्रथम आवृत्ती : २०२०

○ **मूल्य :** 250/-

○ **अक्षर जुळवणी :**
सौ.सोनाली सुरेश वाघ



© **लेखकाधीन**

*All rights reserved.No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means,without permission.Any person who does any unauthorised act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.*

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | नाव | पान क्रमांक |
|---|---|---|
| | ✻ इयत्ता सहावी ✻ | |
| १ | भारतीय उपखंड आणि इतिहास | ५ |
| २ | इतिहासाची साधने | ५ |
| ३ | हडप्पा संस्कृती | ६ |
| ४ | वैदिक संस्कृती | ७ |
| ५ | प्राचीन भारतातील धार्मिक प्रवाह | ९ |
| ६ | जनपदे आणि महाजनपदे | ११ |
| ७ | मौर्यकालीन भारत | १३ |
| ८ | मौर्यसाम्राज्यानंतरची राज्ये | १४ |
| ९ | दक्षिण भारतातील प्राचीन राज्ये | १५ |
| १० | प्राचीन भारत : सांस्कृतिक | १६ |
| ११ | प्राचीन भारत आणि जग | १९ |
| | ✻ इयत्ता सातवी ✻ | |
| १ | इतिहासाची साधने | २० |
| २ | शिवपूर्बकालीन भारत | २० |
| ३ | धार्मिक समन्वय | २१ |
| ४ | शिवपूर्वकालीन महाराष्ट्र | २२ |
| ५ | स्वराज्य स्थापना | २३ |
| ६ | मुघलांशी संघर्ष | २३ |
| ७ | स्वराज्याचा कारभार | २४ |
| ८ | आदर्श राज्यकर्ता | २५ |
| ९ | मराठयांच्या सत्तेचा विस्तार | २६ |
| १० | राष्ट्ररक्षक मराठे | २६ |
| ११ | साम्राज्याची वाटचाल | २७ |
| १२ | महाराष्ट्रातील समाजजीवन | २७ |
| | ✻ इयत्ता आठवी ✻ | |
| १ | इतिहासाची साधने | २८ |
| २ | युरोप आणि भारत | २८ |
| ३ | ब्रिटीश सत्तेचे परिणाम | ३० |


लक्ष्य करीयर अकॅडमी

| प्रकरण क्र. | नाव | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | १८५७ चा स्वातंत्र्य लढा | ३१ |
| २ | सामाजिक व धार्मिक प्रबोधन | ३३ |
| ३ | स्वातंत्र्य चळवळीच्या युगाचा प्रारंभ | ३५ |
| ४ | असहकार चळवळ | ३७ |
| ५ | सविनय कायदेभंग चळवळ | ३९ |
| ६ | स्वातंत्र्य लढ्याचे अंतिम पर्व | ४० |
| ७ | सशस्त्र क्रांतिकारी चळवळ | ४२ |
| ८ | समतेचा लढा | ४४ |
| ९ | स्वातंत्र्यप्राप्ती | ४५ |
| १० | स्वातंत्र्य लढ्याची परिपूर्ती | ४७ |
| ११ | महाराष्ट्र राज्याची निर्मिती | ४८ |
| | ✻ इयत्ता नववी ✻ | |
| १ | प्राचीन व मध्ययुगीन संस्कृती | ५१ |
| २ | प्रबोधनाची चळवळ व सामंतशाही | ५८ |
| ३ | क्रांतीयुग | ६० |
| | ✻ इयत्ता दहावी ✻ | |
| १ | इतिहासलेखन : भारतीय परंपरा | ६३ |
| २ | उपयोजित इतिहास | ६४ |
| ३ | भारतीय कलांचा इतिहास | ६५ |
| ४ | प्रसारमाध्यमे आणि इतिहास | ६६ |
| | ✻ इयत्ता अकरावी ✻ | |
| १ | आद्य शेतकरी | ६८ |
| २ | भारतातील आद्य नगरे | ७१ |
| ३ | भारतातील ताम्रपाषणयुगीन गाव-वसाहती | ७५ |
| ४ | वैदिक काळ | ७८ |
| ५ | जनपदे आणि गणराज्ये | ८० |
| ६ | भारतातील दुसरे नागरीकरण | ८२ |
| ७ | भारत आणि इराण (पर्शिया) | ८७ |
| ८ | मौर्यकालीन भारत | ८८ |


लक्ष्य करीयर अकॅडमी

| प्रकरण क्र. | नाव | पान क्रमांक |
|---|---|---|
| ९ | मौर्योत्तर काळातील भारत | ९१ |
| १० | भारतीय इतिहासातील नवे पर्व | ९३ |
| ११ | दक्षिण भारतातील राज्यसत्ता | ९७ |
| १२ | भारत, वायव्येकडील देश आणि चीन | १०० |
| १३ | दिल्लीची सुलतानशाही, विजयनगर आणि बहमनी राज्य | १०१ |
| १४ | मुघलकालीन भारत | १०३ |
| १५ | स्वराज्य ते साम्राज्य | १०५ |
| | ✻ भूगोल ✻ | |
| | ✻ इयत्ता सहावी ✻ | १०९ |
| १ | पृथ्वी व वृत्ते | ११० |
| २ | वृत्ते | ११० |
| ३ | हवा व हवामान | १११ |
| ४ | तापमान | ११२ |
| ५ | महासागरांचे महत्त्व | ११३ |
| ६ | खडक व खडकांचे प्रकार | ११४ |
| ७ | नैसर्गिक संसाधने | ११५ |
| ८ | उर्जा साधने | ११७ |
| | ✻ इयत्ता सातवी ✻ | |
| १ | सूर्य, चंद्र व पृथ्वी | ११८ |
| २ | भरती - ओहोटी | ११९ |
| ३ | हवेचा दाब | १२१ |
| ४ | वारे | १२३ |
| ५ | नैसर्गिक प्रदेश | १२७ |
| ६ | मृदा | १२८ |
| ७ | ऋतुनिर्मिती | |
| | ✻ इयत्ता आठवी ✻ | १३० |
| १ | स्थानिक वेळ व प्रमाण वेळ | १३१ |
| २ | पृथ्वीचे अंतरंग | १३२ |
| ३ | आर्द्रता व ढग | १३४ |


लक्ष्य करीयर अकॅडमी

| प्रकरण क्र. | नाव | पान क्रमांक |
|---|---|---|
| ४ | सागरतळ रचना | १३४ |
| ५ | सागरप्रवाह | १३५ |
| ६ | भूमी उपयोजन | १३६ |
| ७ | लोकसंख्या | १३७ |
| ८ | उदयोग | १३८ |
| | ✻ इयत्ता नववी ✻ | |
| १ | अंतर्गत हालचाली | १४० |
| २ | बाहयप्रक्रीया भाग - १ | १४३ |
| ३ | बाहयप्रक्रीया भाग - २ | १४५ |
| ४ | वृष्टी | १४७ |
| ५ | सागरजलाचे गुणधर्म | १४८ |
| ६ | आंतरराष्ट्रीय वाररेषा | १४९ |
| ७ | अर्थशास्त्राशी परिचय | १५० |
| ८ | व्यापार | १५० |
| | ✻ इयत्ता दहावी ✻ | |
| १ | स्थान व विस्तार | १५३ |
| २ | प्राकृतिक रचना व जलप्रणाली | १५३ |
| ३ | हवामान | १५५ |
| ४ | नैसर्गिक वनस्पती व प्राणी | १५५ |
| ५ | लोकसंख्या | १५६ |
| ६ | पर्यटन, वाहतुक व संदेशवहन | १५८ |
| | ✻ इयत्ता अकरावी ✻ | |
| १ | भू - हालचाली | १५९ |
| २ | विदारण आणि विस्तृत झीज | १६५ |
| ३ | अपक्षरणाची कारके | १६९ |
| ४ | हवामान प्रदेश | १७५ |
| ५ | जागतिक हवामान बदल | १८० |
| ६ | महासागर साधनसंपत्ती | १८२ |
| ७ | हिंदी महासागर तळरचना व सामरिक महत्त्व | १८६ |



लक्ष्य करीयर अकॅडमी

| प्रकरण क्र. | नाव | पान क्रमांक |
|---|---|---|
| ७ | जीवसंहती | १८७ |
| ८ | आपत्ती व्यवस्थापन | १९३ |
| | ✻ इयत्ता बारावी ✻ | |
| १ | लोकसंख्या : भाग - १ | १९४ |
| २ | लोकसंख्या : भाग -२ | १९५ |
| ३ | मानवी वस्ती व भूमी उपयोजन | १९६ |
| | ✻ पर्यावरण ✻ | |
| | ✻ इयत्ता अकरावी ✻ | |
| १ | पर्यावरण आणि शाश्वत विकास | २०१ |
| २ | परिसंस्था | २०६ |
| ३ | जैवविविधता | २१३ |
| ४ | नैसर्गिक संसाधने | २१६ |
| ५ | आपत्ती | २२० |
| | ✻ इयत्ता बारावी ✻ | |
| १ | मानव आणि पर्यावरण | २२१ |
| २ | पर्यावरण प्रदूषण | २२४ |
| ३ | शाश्वत विकास | २३० |
| ४ | पर्यावरण संरक्षण पद्धती | २३३ |
| ५ | जल सुरक्षा | २३५ |


लक्ष्य करीयर अकॅडमी

आजच्या अत्युच्च स्पर्धेच्या युगात वाढती बेरोजगारी,खाजगी नोकरीतील अस्थिरता यामुळे सरकारी नोकरीकडे तरुणांचा वाढता कल,यातुनच समाजाविषयी आत्मीयता बाळगणारे, वास्तवाचे भान ठेवणारे, स्वच्छ चारित्र्याचे सक्षम अधिकारी निर्माण करण्यासाठी उभारलेली शैक्षणिक चळवळ म्हणजेच **"लक्ष्य करिअर अकॅडमी"**

## परिक्षेचे स्वरुप




| बॅच | सुरु होण्याचा दिनांक | कालावधी |
|---|---|---|
| १) **राज्यसेवा** (Foundation) | १० जून | १ वर्ष |
| २) **PSI / STI / ASO** (Foundation) | १५ जून | १ वर्ष |
| ३) **राज्यसेवा** (Foundation English medium) | १५ जून | १ वर्ष |
| ४) **राज्यसेवा** (Fast track) | १० डिसेंबर | ५ महिने |
| ५) **PSI / STI / ASO** (Fast track) | १५ डिसेंबर | ५ महिने |
| ६) **राज्यसेवा** (Foundation English medium) | १५ डिसेंबर | ५ महिने |

# इतिहास

## * इयत्ता सहावी *

# १. भारतीय उपखंड आणि इतिहास

**भारताची भौगोलिक वैशिष्टये :**

उत्तरेला हिमालय, पूर्वेस बंगालचा उपसागर, पश्चिमेला अरबी समुद्र आणि दक्षिणेला हिंदी महासागर आहे.

**भारतीय इतिहासात खालील सहा भूप्रदेश महत्त्वाचे आहेत.**

**१) हिमालय :**

यामुळे भारतीय उपखंड मध्य आशियातील वाळवंटापासून अलग झाला आहे.

**२) सिंधू–गंगा–ब्रम्हपुत्रा नदयांचा मैदानी प्रदेश :**

पश्चिमेस सिंध–पंजाबपासून पूर्वेकडे सध्याच्या बांग्लादेशपर्यंत पसरलेला आहे. प्राचीन हडप्पा संस्कृती व त्यानंतरची प्राचीन गणराज्ये आणि साम्राज्ये याच प्रदेशात होती.

**३) थरचे वाळवंट :**

राजस्थान, हरियाणा, गुजरात या प्रदेशात आहे. या प्रदेशाच्या उत्तरेला सतलज नदी, पूर्वेस अरवली पर्वताच्या रांगा, दक्षिणेस कच्छचे रण व पश्चिमेस सिंधू नदी आहे. हिमालय प्रदेशात उगम पावणारी घग्गर नदी थरच्या वाळवंटात पोहचते. पाकिस्तानात तिला हाकरा संबोधतात.

**४) दख्खनचे पठार :**

एकीकडे पूर्व किनारा व दुसरीकडे पश्चिम किनारा यांमधील भारतीय भूप्रदेश दक्षिणेकडे निमुळता होत जातो. मौर्य साम्राज्य हे प्राचीन भारतातील सर्वाधिक मोठे साम्राज्य होते.

**५) समुद्रकिनाऱ्यांचे प्रदेश :**

प्राचीन भारतात हडप्पा संस्कृतीच्या काळापासून पश्चिमेकडील देशांशी व्यापार चालत असे.

**६) समुद्रातील बेटे :**

अंदमान–निकोबार ही बंगालच्या उपसागरातील व लक्षद्वीप हा अरबी समुद्रातील बेटांचा समुह आहे.

**पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी :**

पेरिप्लस् = माहितीपुस्तक, एरिथ्रियन सी– तांबडा समुद्र, ग्रीक लोकांच्या दृष्टीने हिंदी महासागर व इराणचे आखात हे तांबडया समुद्राचा भाग होते

# २. इतिहासाची साधने

इतिहासाची साधने तीन प्रकारची आहे. भौतिक साधने, लिखित साधने, मौखिक साधने

**प्राचीन भारताच्या इतिहास– लेखनाची साधने**

लक्ष्य करीयर अकॅडमी

| प्राचीन भारताच्या इतिहास- लेखनाची साधने | | | |
|---|---|---|---|
| भौतिक साधने | | लिखित साधने | मौखिक साधने |
| वस्तू | वास्तू | | |
| गुहाचित्रे<br>मातीची भांडी<br>मातीची शिल्पे<br>मणी<br>रत्ने, दागदागिने<br>दगडी शिल्पे<br>धातूच्या वस्तू<br>नाणी<br>शस्त्रे | गुहा<br>घरे<br>स्तूप<br>लेणी<br>मंदिरे<br>चर्च<br>मशिदी<br>स्तंभ | * हडप्पा लिपीतील लेख<br>* वैदिक साहित्य<br>* मेसोपोटेमियातील इष्टिकालेख<br>* महाभारत, रामायण यांच्या हस्तलिखित पोथ्या<br>* जैन, बौद्ध साहित्य<br>* ग्रीक इतिहासकार आणि प्रवाशांचे लेखन<br>* चिनी प्रवाशांचे प्रवासवर्णन<br>* व्याकरणग्रंथ, पुराणग्रंथ, कोरीव लेख | प्राचीन भारतातील मौखिक परंपरेने जपलेले वैदिक, बौद्ध आणि जैन साहित्य आता लिखित स्वरुपात उपलब्ध आहे.त्यांचे रुपांतर आता लिखित स्वरुपात झाले असले, तरी त्यांची पठणाची परंपरा अजूनही सुरु आहे. मौखिक स्वरुपातील त्या साहित्याचा उपयोग जेव्हा इतिहास-लेखनासाठी केला जातो, तेव्हा त्याचा समावेश मौखिक साधनांत होतो. |

## ३. हडप्पा संस्कृती

१९२१ मध्ये पंजाबमधील रावी नदीच्या काठी हडप्पा येथे प्रथम उत्खनन सुरु झाले म्हणून या संस्कृतीला हडप्पा संस्कृती असे म्हणतात. धोलावीरा, लोथल, कालीबंगन, दायमाबाद इ. ठिकाणी ही अशाच प्रकारचे अवशेष सापडले आहेत.

**घरे व नगररचना :**

घरे भाजक्या विटांची होती. कच्च्या विटा व दगडांचा वापरही बांधकामासाठी केला जाई. घराच्या आवारात विहीरी, स्नानगृहे, शौचालये, सांडपाणी वाहून नेण्याची उत्तम व्यवस्था असे. रस्ते रुंद असुन एकमेकांना काटकोनात छेदत. नगरांचे दोन वा अधिक विभाग असून प्रत्येक विभागाची स्वतंत्र तटबंदी असे.

**मुद्रा- भांडी :**

मुद्रा प्राधान्याने चौरस असून स्टिएटाईट नावाच्या दगडापासुन बनवल्या जात. मुद्रांवर बैल, म्हैस, हत्ती, गेंडा, वाघ यांसारखे खरे प्राणी तसेच एकशृंगासारखे कल्पित प्राणी आहेत. या मुद्रा ठसा उमटवण्यासाठी वापरत. हे लोक मृत व्यक्तीचे दफन करतांना त्या व्यक्तीच्या शवाबरोबर मातीची भांडी पुरत असतात.

**महास्नानगृह :**

मोहेंजोदडो येथे महास्नानगृह सापडले. याची लांबी १२ मी., रुंदी ७ मी. व खोली २.५ मी असून पक्क्या विटांचे बांधकाम होते. पाणी वेळोवेळी बदलण्याची सोय होती.

**लोकजीवन**

लोक शेती करत होते. कालीबंगन येथे नांगरलेल्या शेताचा पुरावा मिळाला आहे. गहु, सातू (बार्ली) ही मुख्य पिके होती. राजस्थान- सातूचे पीक, गुजरात- नाचणीचे पीक मोठया प्रमाणावर

मानवी जीवनाचे पूर्ण ज्ञान प्राप्त झाल्याने त्यांना बुद्ध म्हटले. वैशाख पौर्णिमेला बिहारमधील गया शहरापासून जवळ असलेल्या अरुवेला या ठिकाणी पिंपळाच्या झाडाखाली बोधि(सर्वोच्च ज्ञान) प्राप्ती झाली. अरुवेला म्हणजेच बोधगया.

पहिले प्रवचन वाराणसीजवळ सारनाथ येथे दिले. या प्रवचनातील उपदेशास धम्म असे म्हटले जाते. या प्रवचनाद्वारे धम्माच्या चक्राला गती दिली यास 'धम्मचक्कपवत्तनर' असे म्हणतात.

बुद्धांनी आपला उपदेश पाली भाषेत केला. बुद्धांनी त्रिशरण– बुद्ध, धम्म, संघ यांना शरण जाण्याची संकल्पना मांडली.

**आर्यसत्ये**

१) दु:ख : मानवी जीवनात दु:ख असते.
२) दु:खाचे कारण : दु:खाला कारण असते.
३) दु:ख निवारण : दु:ख दूर करता येते.
४) प्रतिपद : हा दु:खाचा अंत करण्याचा मार्ग आहे. या मार्गास अष्टांगिक मार्ग असे म्हणतात.

**पंचशील :**

बुद्धांनी ५ नियमांचे पालन करण्यास सांगितले.
१) प्राण्यांची हत्या करण्यापासून दूर राहणे.
२) चोरी करण्यापासून दूर राहणे.
३) अनैतिक आचरणापासून दूर राहणे.
४) असत्य बोलण्यापासून दूर राहणे.
५) मादक पदार्थांच्या सेवनापासून दूर राहणे.

**बौद्ध संघ :**

गृहस्थ जीवनाचा त्याग करुन संघात प्रवेश करणाऱ्या त्यांच्या अनुयायांना 'भिक्खू' असे म्हणतात. भिक्खू चारिका करुन लोकांना धम्माचा उपदेश करत असत. स्त्रियांचा स्वतंत्र संघ होता. त्यांना भिक्खूनी म्हणत. धर्मात सर्व वर्ण व जातीमधील लोकांना प्रवेश होता.

लक्ष्य करीयर अकॅडमी

**अष्टांगिक मार्ग :**

१) सम्यक् दृष्टी : चार आर्यसत्यांचे ज्ञान
२) सम्यक् संकल्प : हिंसा इ. तत्वांचा त्याग होय.
३) सम्यक् वाचा : असत्य, चहाटी, कठोरता, आणि निरर्थर बडबड न करणे.
४) सम्यक् कर्मान्त : प्राण्यांची हत्या, चोरी आणि स्वैराचार यांच्या पासून दूर राहणे.
५) सम्यक् आजीव : उपजीविका गैर मार्गाने न करता योग्य मार्गाने करणे.
६) सम्यक् व्यायाम : व्यायाम म्हणजे प्रयत्न करणे होय. वाईट कर्मे उत्पन्न होऊ नयेत, उत्पन्न झाल्यास त्यांचा त्याग करावा. चांगली कर्म उत्पन्न करावीत.
७) सम्यक् स्मृती : मन एकाग्र करुन लोभ सारख्या विकारांना दूर करणे.
८) सम्यक् समाधी : चित्त एकाग्र करुन ध्यानाचा अनुभव घेणे.

**उपदेशाचे सार :**

गौतम बुद्धांनी मानवी बुद्धीच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. पुरुषांप्रमाणे स्त्रीयांनाही स्वत:ची

# ७. मौर्यकालीन भारत

इ.स.पू.३२६ मध्ये ग्रीक सम्राट अलेक्झांडर याने भारताच्या वायव्य प्रदेशावर स्वारी केली. भारतातील जिंकलेल्या प्रदेशाच्या व्यवस्थेसाठी ग्रीक अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या, त्यांना 'सत्रप' म्हणतात. ग्रीक मूर्तिकलेचा भारतीय कलाशैलीवर प्रभाव पडला. यातून पुढे 'गांधार कलाशैलीचा' उदय झाला. ग्रीक नाण्यांवर एका बाजुला नाणे पाडणाऱ्या राजाचे चित्र तर दुसऱ्या बाजुला एखादया ग्रीक देवतेचे चित्र असते.

**मौर्य साम्राज्य :**

**चंद्रगुप्त मौर्य :**

चंद्रगुप्त मौर्याने मौर्य साम्राज्याची स्थापना केली. इ.स.पू. ३२५ च्या सुमारास मगधावर स्वत:ची सत्ता स्थापन केली. मेगॅस्थिनिस हा सेल्युकस निकेटरचा राजदूत चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात होता. त्याने लिहिलेला 'इंडिका' हा ग्रंथ मौर्यकालीन भारताच्या अभ्यासाचे महत्त्वाचे साधन आहे. गुजरात राज्यातील जुनागढजवळ सम्राट चंद्रगुप्त मौर्याने 'सुदर्शन' नावाचे धरण बांधलेले होते. सेल्युकस निकेटर हा सिकंदराचा सेनापती होता.

विशाखादत्त या संस्कृत नाटककाराने 'मुद्राराक्षस' हे नाटक लिहिले. त्यात धनानंदाचा नाश करुन चंद्रगुप्त मौर्याने स्वतंत्र सत्ता कशी स्थापन केली हे समजावले आहे. जैन परंपरेनुसार चंद्रगुप्त मौर्याने जैन धर्माचा स्वीकार केला होता.

**सम्राट अशोक :**

इ.स.पू.२७३ मध्ये सत्तेवर आला. अशोकाचे शिलालेख ब्राम्ही लिपीत आहेत. यांमध्ये त्याने स्वत:चा उल्लेख 'देवानं पियो पियदसी' असा केला आहे. सम्राट अशोकाच्या दिल्ली–टोपडा येथील एका लेखात वटवाघळे, माकडे, गेंडे इ. शिकार करु नये; जंगलात वणवे लावू नयेत असे सक्त निर्बंध लिहून ठेवले होते.

लक्ष्य करीयर अकॅडमी

**धर्मप्रसार :**

अशोकाने बौद्ध धर्माचा स्विकार केला होता. बौद्ध धर्माची तिसरी परिषद पाटलिपुत्र येथे भरवली. बौद्ध धर्मप्रसारासाठी मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा यांना श्रीलंकेस पाठवले.

**मौर्य राज्यव्यवस्था :**

राजधानी : पाटलिपुत्र

राज्यकारभार सोईसाठी साम्राज्याचे चार विभाग पाडले होते.

| विभाग | राजधानी |
|---|---|
| १) पूर्व विभाग | तोशाली(ओडिशा) |
| २) पश्चिम विभाग | उज्जयिनी(मध्य प्रदेश) |
| ३) दक्षिण विभाग | सुवर्णगिरी(कर्नाटकातील कनकगिरी) |
| ४) उत्तर विभाग | तक्षशिला(पाकिस्तान) |

**दुसरा चंद्रगुप्त :**

या राजाने आपली मुलगी प्रभावती हीचा विवाह वाकाटक घराण्यातील दुसरा रुद्रसेन राजाशी करुन दिला. दिल्लीजवळील मेहरौली येथे एक लोहस्तंभ उभा आहे. हा सुमारे दीड हजार वर्षाहून जुना आहे. या स्तंभावरील लेखात 'चंद्र' नावाच्या राजाचा उल्लेख आहे. यावरुन तो दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळातील आहे असे मानले जाते. फाहियान हा चिनी प्रवासी दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात भारतात आला होता.

**वर्धन राजघराणे :**

दिल्लीजवळील थानेसर या ठिकाणी राज्य करणाऱ्या प्रभाकरवर्धन या राजाने वर्धन घराण्याची स्थापना केली. हर्षवर्धनाने साम्राज्याचा विस्तार केला होता. कामरुप म्हणजे आसाम येथील भास्करवर्मन राजाशी हर्षवर्धनाचे मैत्रीचे संबंध होते व त्याने आपला राजदूत चिनी दरबारात पाठवला होता. आपली राजधानी कनौज येथे प्रस्थापित केली. हर्षवर्धन दर पाच वर्षांनी स्वतःची सर्व संपत्ती प्रजेला दान करीत असे.

हर्षवर्धनाच्या दरबारातील राजकवी बाणभट्ट याने 'हर्षचरीत' हा त्याच्या जीवनावरील ग्रंथ लिहीला. त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता व इतर धर्मांनाही आश्रय दिला होता. हर्षवर्धनाने 'रत्नावली', 'नागानंद', 'प्रियदर्शिका' हे तीन संस्कृत नाटके लिहीली. याच काळात युआन श्वांग हा बौद्ध भिक्खू चीनहून भारतात आला होता. युआन श्वांग ने महाराष्ट्रीयन लोकांबद्दल गौरवोद्गार काढले आहेत.

**ईशान्य भारतातील राजसत्ता :**

'कामरुप' नावाचे राज्य इ.स. चौथ्या शतकात उदयास आले. पुण्यवर्मन कामरुपचा संस्थापक होता. समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद स्तंभालेखात त्याचा उल्लेख आहे. महाभारत व रामायण या महाकाव्यांमध्ये कामरुपचा उल्लेख प्रागज्योतिष असा आहे. 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' या पुस्तकात त्याचा उल्लेख 'किऱ्हादिया' म्हणजे 'किरात लोकांचा प्रदेश' असा आहे. ईशान्य भारतातील 'कामरुप' राज्यात युआन श्वांग गेला होता. तेव्हा भास्करवर्मन तेथे राज्य करत होता.

काश्मीरचे प्राचीन नाव 'कश्यपूर' असे होते. कल्हणाने राजतरंगिणी या ग्रंथात त्याची माहिती दिली आहे.

## ९.दक्षिण भारतातील प्राचीन राज्ये

तामिळ भाषेतील संघम साहित्यात चेर, पांडय, चोळ अशा तीन राजसत्तांचा उल्लेख आहे. 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' या पुस्तकात 'मुझिरीस' हे केरळच्या किनाऱ्यावरील महत्त्वाचे बंदर आहे असे सांगितले होते. या बंदरातून मसाल्याचे पदार्थ, मोती, मौल्यवान रत्ने इ. वस्तूंची इटलीतील रोम आणि पश्चिमेकडील इतर देशांकडे निर्यात होत असे.

**सातवाहन राजघराणे :**

प्रतिष्ठाण (पैठण) ही त्यांची राजधानी होती. राजा सिमुक–संस्थापक. काही सातवाहन राजे त्यांच्या नावाआधी आईचे नाव लावत असत.

उदा. गौतमीपुत्र सातकर्णी

गौतमीपुत्र सातकर्णी चा उल्लेख नाशिकच्या लेखात 'त्रिसमुद्रतोयपीतवाहन' असा केलेला आहे.

**धार्मिक साहित्य :**

जैन आगमग्रंथ, अर्धमागधी, शौरसैनी, माहाराष्ट्री अशा प्राकृत भाषेत आहेत. यांमध्ये वर्धमान महावीरांचा उपदेश संकलित करण्यात आला आहे.

अपभ्रंश भाषेत महापुराण, चरित्रे, कथा इ.वाङ्मय आहे.

सम्मइसुत्त : सिद्धसेन दिवाकरने लिहीलेला न्यायशास्त्रावरील प्राकृत ग्रंथ आहे.

पडमचरिय : विमलसूरींनी प्राकृत भाषेत रामकथा काव्यात्मक स्वरुपात सांगितली आहे.

हरिभद्रसुरी : समराइच्चकहा, उदयोतनसुरी, कुवलयमालाकहा हे ग्रंथ महत्त्वाचे.

तिपिटक पाली भाषेत लिहीले आहेत.

**१.सुत्तपिटक :** गौतम बुद्धाच्या उपदेशांची वचने एकत्रित करण्यात आली आहेत.

**२.विनयपिटक :** बौद्ध संघातील भिक्खू आणि भिक्खूनी यांनी दैनंदिन जीवनात कसे वागावे याचे नियम सांगितले आहेत.

**३.अभिधम्मपिटक :** बौद्ध धर्माचे तत्वज्ञान समजावून सांगितले आहे.

**४.अट्ठकथा :** तिपिटकाचे स्पष्टिकरण करणारे ग्रंथ

**५.थेरीगाथा :** ज्ञानी स्त्रियांनी स्वत:चे अनुभव सांगणाऱ्या गाथा रचल्या. या पाली भाषेत आहेत.

इ.स.आठव्या शतकात आदय शंकराचार्य होऊन गेले. त्यांनी ज्ञान, वैराग्य या गोष्टीवर भर दिला. उपनिषदे, ब्रम्हसुत्रे आणि भगवद्गीता यावर भाष्ये लिहून त्याचा अर्थ स्पष्ट केला. बद्रीनाथ, द्वारका, जगन्नापुरी, श्रृगेंरी या चार मठांची स्थापना केली. कौटिल्याने अर्थशास्त्र हा ग्रंथ लिहून शासनव्यवस्था कशी असावी याची चर्चा केली.

**व्याकरणग्रंथ :**

पाणिनीने अष्टाध्यायी हा संस्कृत व्याकरणाचा प्रमाणग्रंथ लिहिला. पतंजलीने महाभाष्य हा ग्रंथ लिहिला.

| रचनाकार | ग्रंथ |
|---|---|
| १) रामायण | वाल्मिकी ऋषी |
| २) महाभारत | व्यास ऋषी |
| ३) रघुवंश, कुमारसंभव | कालिदास |
| ४) किरातार्जुनीय | भारवी |
| ५) शिशुपालवध | माघ |
| ६) नाध्यशास्त्र | भरतमुनी |
| ७) स्वप्नवासवदत्त | भास |
| ८) अभिज्ञान शांकुतल | कालिदास |
| ९) बृहत्कथाठ (पैशाची भाषेतील) | गुणाठय |
| १०) पंचतंत्र | विष्णुशर्मा |
| ११) चरकसंहिता | चरक |
| १२) सुश्रुतसंहिता | सुश्रूत |
| १३) अष्टांगसंग्रह, अष्टांगहदयसंहिता | वाग्भट |
| १४) रसरत्नाकर | सिद्ध नागार्जुन |
| १५) आर्यभटीय | आर्यभट |
| १६) पंचसिद्धान्तिका | वराहमिहिर |

**१) ब्राम्हण :** वेदांचे व इतर ज्ञानाचे अध्ययन, अध्यापन व धार्मिक विधी करणे.

**२) क्षत्रिय :** ज्ञानार्जन करणे, राज्यकारभार करणे व राज्यरक्षण करणे.

**३) वैश्य :** शेती, पशुपालन, व्यापार, उदयोग इ. कामे करणे.

**४) शुद्र :** ज्ञानार्जन नाकारण्यात आले. त्यांना हलकीसलकी कामे करावी लागत.

वैदिक काळात धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थासाठी आश्रमव्यवस्था होती.

**ब्रम्हचर्याश्रम :** गुरुगृही राहून अध्ययन करावे.

**गृहस्थाश्रम :** शिक्षण संपल्यावर विवाह करुन अर्थ व काम हे पुरुषार्थ साध्य करावे.

**वानप्रस्थाश्रम :** पन्नाशीनंतर सुखी जीवनाचा त्याग करुन ईश्वरी चिंतनासाठी वनात जावे.

**संन्यासाश्रम :** ईश्वरी चिंतनातून मोक्ष प्राप्ती करावी.

उत्तर वैदीक काळात युद्धजन्य परिस्थितीमुळे वंश व संपत्ती रक्षणासाठी मुलांना महत्त्व मिळाले. स्त्री-शिक्षिणाकडे दुर्लक्ष झाले.

**आर्यांचे सांस्कृतिक जीवन :**

आर्य लोक सुती व रेशमी वस्त्रे परीधान करत. कापडावर काशिदा काम केले जाई. पुरुषही अलं-कार वापरत. 'निष्क' हा गळयातील दागिना प्रसिद्ध होता. स्नानावेळी सुगंधी उटण्याचा वापर केला जाई.

**धर्मकल्पना :**

ऋग्वेदात सृष्टीत तीन घटक सांगितले आहेत. या प्रत्येक घटकांत ११ याप्रमाणे आर्यांच्या ३३ देवता होत्या.

**१) पृथ्वीवरील :** पृथ्वी, अग्नी, बृहस्पती, सोम इ.

**२) अंतरिक्षातील :** इंद्र, रुद्र, पर्जन्य, वायू इ.

**३) आकाशातील :** सूर्य, उषा, विष्णू, चंद्र, वरुण इ.

वरील देवतांपैकी इंद्र, वरुण, सूर्य, उषा, अग्नी, रुद्र या आर्यांच्या प्रमुख देवता होत्या. आर्यांनी देवतांना मुर्तीचे स्वरुप दिले नाही. निसर्ग देवतांच्या माध्यमातून त्याची कृपादृष्टी प्राप्त करण्यासाठी आर्यांनी यज्ञ विधीला महत्त्व दिले. या माध्यमातून सुख, स्वास्थ, आर्थिक समृद्धी, शत्रुपासुन संरक्षण लाभते अशी आर्यांची श्रद्धा होती. वैदिक युगाच्या अखेरीस यज्ञविधीचे स्तोम माजले. हे करणाऱ्या पुरोहित वर्गाचे प्रस्थ वाढले व यज्ञामध्ये पशुबळी हे देण्याची प्रथा सुरु झाली. या काळातील चार्वाक, कपिल इ. तत्त्ववेत्यांनी बुद्धीप्रामाण्यावर भर देऊन नवीन सामाजिक तत्वज्ञानावर आधारित विचारसरणीचा पाया घातला.

**जैन धर्म :**

जैन शब्दाची उत्पत्ती 'जिन' (म्हणजे जिंकणे) या शब्दापासून झाली. जैन वाङ्मयामध्ये २४ तीर्थंकर होऊन गेले. ऋषभदेव हे पहिले तीर्थंकर होत. पार्श्वनाथ (२३ वे), महावीर वर्धमान (२४ वे).

**पार्श्वनाथ :**

बनारसचा नागवंशीय राजा अश्वसेन यांचा मुलगा. ज्ञानप्रसार करताना त्यांनी सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह या तत्वांवर भर दिला.

लक्ष्य करीयर अकॅडमी

**महावीर वर्धमान :**

जन्म इ. स. पूर्व ५९९ मध्ये वैशालीजवळ कुंदग्राम येथे क्षत्रिय घराण्यात सिद्धार्थ व त्रिशलादेवी यांच्या पोटी वयाच्या ७२ व्या वर्षी. इ. स. पूर्व ५२७ मध्ये पावा येथे त्यांचे महापरिनिर्वाण झाले. महावीरांना यज्ञयाग, जातिव्यवस्था, वेदप्रामाण्य अमान्य होते. कर्मकांड व पुरोहितांचे प्राबल्य यांस त्यांनी विरोध केला. स्त्रियांना समतेची वागणुक मिळावी असा त्यांचा आग्रह होता.

'अहिंसा परमो धर्म' हे त्यांचे ब्रीद्रवाक्य आहे. आपले तत्वज्ञान मांडण्यासाठी महावीरांनी अर्धमागधी भाषेचा वापर केला.

**त्रिरत्ने :**

**१) सम्यक् दर्शन :** महावीरांच्या तत्वज्ञानावर श्रद्धा ठेवणे.

**२) सम्यक् ज्ञान :** जीवनाचे तत्वज्ञान आत्मसात करण्यासाठी महावीरांची शिकवण आत्मसात करणे.

**३) सम्यक् चारित्र्य :** जैन धर्माच्या नियमांचे पालन करणे.

जैन धर्मात आचरणाला विशेष महत्त्व आहे. जर तसे झाले नाही तर समाजस्वास्थ बिघडते व मानवी दुःखात वाढ होते.

**पंच अनुव्रते वा महाव्रते :**

**१) सत्य :** नेहमी खरे बोलावे

**२) अहिंसा :** कोणत्याही जीवाची हत्या करु नये.

**३) अस्तेय :** चोरी करु नये.

**४) अपरिग्रह :** द्रव्य संचय करु नये, स्वार्थी वृत्तीचा त्याग करावा.

**५) ब्रम्हचर्य :** मनामध्ये कामवासना बाळगु नये.

श्वेतांबर व दिगंबर हे जैन धर्मातील दोन संप्रदाय होते.

लक्ष्य करीयर अकॅडमी

**बौद्ध धर्म :**

मुळ नाव : सिद्धार्थ, शाक्य गणराज्यातील राजा शुद्धोधन व मायादेवी यांच्या पोटी इ. स. पूर्व ५६३ मध्ये लुंबिनी येथे जन्म.

**महाभिनिष्क्रमण :**

वार्धक्य, व्याधी, मरण, शोक ही जीवनातील दुःखे अटळ आहे. मानवी दुःखाचे मूळ शोधून काढण्याची गरज त्यांना वाटू लागली. यासाठी एके रात्री त्यांनी संसाराचा त्याग केला. यास महाभिनिष्क्रमण म्हणतात. गया येथे निरंजना नदीच्या काठी बोधी वृक्षाखाली ध्यानस्थ बसले असता वैशाख पौर्णिमेस त्यांना दिव्य ज्ञानप्राप्ती झाली. ज्ञानी बुद्धांनी सारनाथ येथे पहिले प्रवचन दिले. वयाच्या ८० व्या वर्षी कुशीनगर येथे इ.स.पू.४८३ मध्ये गौतम बुद्धांचे महापरिनिर्वाण झाले. बुद्धांनी 'पाली' या भाषेतून बौद्ध धर्माची शिकवण व आचार-विचार सांगितले. ही माहीती विनयपिटक, सुत्तपिटक, अधिधम्मपिटक या त्रिपिटकांत सांगितली आहे.

**चार आर्यसत्ये :**

**१) दुःख :** मानवी जीवन, व्याधी, म्हातारपण, पश्चाताप, मृत्यू यांमूळे दुःखमय आहे.

**२) तृष्णा :** वासना हे दुःखाचे मूळ कारण आहे.

**३) दुःखाचे निराकरण :** सर्व प्रकारची आसक्ती सोडल्याने दुःखाचा शेवट होतो.

**४) प्रतिपद :** दुःखातून सुटका होण्यासाठी सदाचाराचा मार्ग अवलंबावा.

**अष्टांग मार्ग :**

**१) सम्यक् दृष्टी :** मानवाने जीवनाकडे सारासार व योग्य दृष्टीने पाहिले पाहिजे.

**२) सम्यक् विचार :** सत्ता, संपत्ती, राग, लोभ यांचा त्याग करावा.

**३) सम्यक् भाषण :** आपले बोलणे सत्य असावे, कोणाचीही निंदा करु नये.

**४) सम्यक् कृती :** फळाची अपेक्षा न करता योग्य कर्म करावे.

**५) सम्यक् उपजीविका :** उदरनिर्वाहासाठी नीतिमार्गाने संपत्ती मिळवावी.

**६) सम्यक् व्यायाम :** इंद्रीयांवर संयम ठेवणे, मनातील दुष्ट विचारांचा त्याग व सद्‌विचारांचा स्वीकार करणे होय.

**७) सम्यक् स्मृती :** इंद्रियावर ताबा ठेवून आत्मसंयमाने राहून चांगल्या स्मृती जपाव्यात.

**८) सम्यक् समाधी :** योग्य चिंतन करुन ध्यानस्थ व्हावे म्हणजे निर्वाणपदाला जाता येते.

या अष्टांग मार्गाचा सार म्हणजे 'शील, समाधी व प्रज्ञा' होय.

**पंचशील :**

**१) अहिंसा :** कोणत्याही प्राणीमात्राची हिंसा करु नये.

**२) सत्य :** नेहमी खरे बोलावे

**३) अस्तेय :** जे आपले नाही त्याची अभिलाषा धरु नये, चोरी करु नये.

**४) इंद्रिय संयम :** वासनेवर नियंत्रण ठेवावे

**५) मादक पदार्थांचे सेवन करु नये.**

लक्ष्य करीयर अकॅडमी

**अरब :**

**उदय**

आशियाच्या नैऋत्येकडील द्वीपकल्पीय भागात अरब संस्कृती उदयास आली. सुरवातीस हा प्रदेश इजिप्त व रोमन संस्कृतीच्या प्रभावाखाली होता.

प्राचीन काळी अरब निसर्गपुजक होते. ते मक्केजवळील काबा येथील उल्कापाषाणाची पूजा करत. पूर्वकडील भारत व चीनमधील वस्तू आयात करुन पाश्चात्त्य देशात त्यांची निर्यात करणे हे त्यांच्या व्यापाराचे मुख्य वैशिष्ट्य होते. प्रेषित मुहम्मद पैगंबर यांचा जन्म इ.स.५७१ मध्ये मक्केतील कुरेशी घराण्यात झाला. त्यांच्या शिष्यांनी उपदेश वचनांचा एकत्रित केलेला संग्रह 'हादीस' म्हणून ओळखला जातो. मुहम्मद पैगंबरांनी इ.स.६२२ मध्ये मक्केहून मदिनेला स्थलांतर केले. या ऐतिहासिक घटनेला 'हिजरा' असे म्हटले जाते. या घटनेनुसार 'हिजरी सन' सुरु झाला.

**इस्लामची शिकवण :**

**१) कलमा :** अल्लाह एकच असून मुहम्मद पैगंबर हे त्यांचे प्रेषित आहेत.

**२) नमाज (प्रार्थना) :** प्रत्येक मुस्लिमाने रोज पाच वेळा नमाज पढावा.

**३) रोजा (उपवास) :** रमजानच्या महिन्यात प्रत्येक मुस्लिमाने निर्जळी उपवास करावा.


उष्ण व शीत प्रवाह येथे एकत्र येतात. त्या भागात दाट धूके निर्माण होते.

सागरी प्रवाहास अनुसरुन जलवाहतूक केली असता जहाजाचा वेग वाढून वेळेची व इंधनाची बचत होते व वाहतूक कमी खर्चिक होते. शीत प्रवाहालगतच्या किनारपट्टीवर पर्जन्याचे प्रमाण कमी असते. उदा. पेरु, चिली, नैऋत्य आफ्रिका येथील ओसाड वाळवंटी प्रदेश.

**खोलवर वाहणारे सागरी प्रवाह :**

५०० मी. अधिक खोलीवरील प्रवाह हे पाण्याच्या तापमान व घनतेतील तफावती मूळे तयार होतात. यालाच उष्णताक्षारता अभिसरण म्हटले जाते. वेगवेगळया भागांतील पाण्याचे तापमान हे ही खोल सागरातील प्रवाहांमागचे महत्त्वाचे कारण आहे. साधारणत: ग्रीनलँड व युरोपीय खंड यांमधील भागात पृष्ठीय जल जास्त खोलीकडे वाहत जाते. हे जल खोलीवरुनच अंटार्टिका खंडापर्यंत जाते.

या प्रकारे संपूर्ण सागरजलाचे पुनर्वितरण घडत असते. हे होण्यासाठी सुमारे पाचशे वर्षाचा कालावधी लागतो. पृष्ठीय भागातील उष्ण जल तळाकडे व तळाकडील पोषक द्रव्यांनी समृद्ध व शीत जल पृष्ठाकडे नेले जाते. उन्हाळ्यात उत्तर हिंदी महासागरात सागर प्रवाह घड्याळयाच्या काटयाच्या दिशेने वाहतात; तर हिवाळयात ते विरुद्ध दिशेने वाहतात.




**सागरी प्रवाह**

## ६. भूमी उपयोजन

भूमी उपयोजना: भूमीचा वापर

भौगोलिक घटक आणि मानव यांच्या आंतरक्रियेतून निर्माण होते.

जमिनीचा कस वाढवण्यासाठी एक ते दोन हंगाम शेतजमिनीचा काही भाग शेतकरी वापरत नाहीत. यास चालू पड म्हणतात. सीमांकित केलेले वनक्षेत्र ग्रामीण भूमी उपयोजनाचा एक भाग आहे. या वनक्षेत्रांतून लाकूड, डिंक, गवत इ. वनोत्पादने मिळतात.

**गायरान/माळरान :**

गाव पंचायतीच्या मालकीची जमीन किंवा शासनाच्या मालकीची जमीन जी चराऊ जमीन म्हणून

**वयोगट :**

कार्यक्षम लोकसंख्या– १५ ते ५९ वर्ष वयोगट; अर्थव्यवस्थेत प्रत्यक्षरित्या सहभागी असतात.
अवलंबित गट– १५ वर्षापेक्षा कमी व ६० वर्ष वा त्यापेक्षा अधिक वयाचे व्यक्ती

जे लोक कार्यक्षम वयोगटात असून ही नोकरी वा व्यवसाय करीत नाहीत. त्यांना अकार्यकारी समजले जाते. कार्यकारी लोकांचे प्रमाण अधिक असेल, तर त्या लोकसंख्येस उदयमशील मानले जाते.

ग्रामीण भागातील लोक मोठया प्रमाणात प्राथमिक व्यवसायात गुंतलेले असतात. नागरी भागात द्वितीयक व तृतीयक व्यवसायांमध्ये गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण जास्त असते. लिहीता–वाचता येणाऱ्या लोकांस आपल्या देशात साक्षर समजले जाते. वय वर्षे ७ पेक्षा अधिक वयोगटातील लोकांचे साक्षर वा निरक्षर म्हणून वर्गीकरण केले जाते.

भारतासारख्या देशात स्थलांतरीतांची टक्केवारी कमी असली तरी भारतातील एकूण लोकसंख्ये–च्या तुलनेने ही संख्या जास्त असते.

१९८० आणि १९९० च्या दशकात महबूब–उल हक आणि अमर्त्य सेन यांनी मानव विकास निर्देशांक ही संकल्पना मांडली. यावर आधारित मानव विकास निर्देशांक दरवर्षी संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) मार्फत प्रकाशित केला जातो. हा निर्देशांक ठरवितांना खालील तीन प्रमुख निकष विचारात घेतले जातात.

१) आर्थिक निकष (सरासरी राहणीमान)
२) आरोग्य (अपेक्षित आर्युमान)
३) शिक्षण (शैक्षणिक कालावधी)

मानव विकास निर्देशांकांचे मूल्य ० ते १ दरम्यान असते. अति विकसित प्रदेशाचे निर्देशांक एकच्या जवळ तर प्रदेशातील विकास जसजसा कमी होत जातो. तसतसा निर्देशांक कमी कमी होत जातो.

**महाराष्ट्रातील लोकसंख्येची घनता :**

महाराष्ट्राच्या पूर्व भागातील जिल्हयांमध्ये लोकसंख्येची घनता कमी असून पश्चिमेकडील जिल्ह–यांमध्ये लोकसंख्येची घनता जास्त आहे. लोकसंख्येच्या घनतेवर औदयोगिकीकरण व नागरीकरणाचा प्रभाव जास्त आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, कोल्हापूर या जिल्हयांत लोकसंख्येची घनता जास्त आहे. नागपूर, नाशिक, अहमदनगर इ. जिल्हयांत लोकसंख्येची घनता मध्यम आहे. पर्जन्यछायेच्या प्रदेशातील जिल्हे व अतिपूर्वेकडील घनदाट वने असलेल्या जिल्हयांमध्ये लोकसंख्येची घनता कमी आहे. सर्वेक्षणानुसार घरगुती वापरासाठी दररोज ५० लि. पाणी वापरले जाते.

## ८. उदयोग

लोह–पोलाद उदयोगाच्या स्थानिकीकरणासाठी आवश्यक कच्चा माल, उर्जा साधने हे प्रमुख घटक असतात.

**उदयोगाचे स्वरुपानुसार वर्गीकरण**

- लघु उदयोग
  मातीच्या भांडी बनवणे,
  बेकरी इ.
- मध्यम उदयोग
  फळप्रक्रिया उदयोग
  गुऱ्हाळ इ.
- अवजड/मोठे उदयोग
  सिमेंट, साखर
  लोह–पोलाद इ.

# * इयत्ता ९ वी *

## २. अंतर्गत हालचाली

भूकंप व ज्वालामुखी या पृथ्वीच्या अंतरंगातील अस्थिरतेमुळे घडतात. भूपृष्ठांतर्गत हालचाली मुख्यत: प्रावरणाच्या वरच्या थरात होतात. प्रावरणातील किरणोत्सारी पदार्थातून प्रचंड प्रमाणात उर्जा निर्माण होत असते. या उर्जालहरी एका ठिकाणातून दुसऱ्या ठिकाणी जात असतात. उर्जेच्या अशा प्रवाहा–मुळे पृथ्वीच्या अंतरंगात अस्थिरता निर्माण होऊन हालचाली होतात. अंतर्गत भू–हालचालींचे वर्गीकरण गती, दिशा व भूरुपांवर आधारित केले जाते.

| वर्गीकरणाचा आधार | हालचाली |
|---|---|
| १) गती | अ) मंद भू–हालचाली (सातत्याने होणाऱ्या)<br>उदा: पर्वत व खंडांची निर्मिती<br>ब) शीघ्र भू–हालचाली (घटनेच्या स्वरुपात होणाऱ्या)<br>उदा: भूकंप, ज्वालामुखी. |
| २) दिशा | अ) क्षितिजसमांतर भू–हालचाली.<br>ब) ऊर्ध्वगामी, अधोगामी भू–हालचाली |
| ३) भूरूपे | अ) खंडजन्य (भूखंड, पठारे व उच्चभूमी करणाऱ्या)<br>ब) पर्वतजन्य (वलीकरण, प्रस्तरभंग क्रिया) |

**मंद भू हालचाली :**

या हालचालीचे भू–कवचावर पर्वतनिर्मिती व खंडनिर्मितीच्या स्वरुपात परिणाम दिसून येतात. भूपट्टाच्या दोन्ही बाजूंकडून पट्टीच्या केंद्राकडे दाब दिला गेल्यास पट्टी सरकते व तिला घडया पडतात. अशाच प्रकारे भूकवचात दाबामुळे हालचाली निर्माण होतात व त्यामुळे भूकवचाला घडया पडतात.

लक्ष्य करीयर अकॅडमी

**वली पर्वत :**

पृथ्वीच्या अंतर्गत भागातून उर्जेचे वहन होते. या उर्जालहरींमूळे मृदू खडकांच्या थरावर क्षितीज–समांतर व एकमेकांच्या दिशेने दाब पडून वळया मोठया प्रमाणात पडतात व त्यांची गुंतागुंत वाढते. परिणामी पृष्ठभाग उचलला जाऊन वली पर्वतांची निर्मिती होते. उदा: हिमालय, अरवली, रॉकी, अँडीज इ.

**गट पर्वत :**

अंतर्गत हालचालींमूळे क्षितीजसमांतर व एकमेकांपासून दूर जाणाऱ्या उर्जालहरी निर्माण होतात. अशावेळी खडकांवर ताण निर्माण होतो. त्यामुळे खडकांना तडे (विभंग) पडतात. कठीण खडकांमध्ये उर्जालहरी एकमेकांकडे आल्याने दाब पडूनही असे विभंग तयार होतात. दोन समांतर विभंगांमधील भूक–वचाचा भाग जेव्हा वर उचलला जातो. तेव्हा हा उचलला गेलेला भाग ठोकळयाप्रमाणे दिसतो. असा भूभाग गट पर्वत म्हणून ओळखला जातो. गट पर्वताचा माथा सपाट असतो. त्याच्या सुरवातीच्या काळात –शिखरे नसतात. त्यांचे उतार तीव्र असतात. उदा. युरोपमधील ब्लॅक फॉरेस्ट पर्वत, भारतातील मेघालय पर्वत. भूपृष्ठावर क्षितीजसमांतर हालचाली जेव्हा परपस्पर विरोधी दिशांना होतात, तेव्हा भूकवचातील खडकांवर ताण पडतो. ताण वाढल्यास खडकांना तडे पडतात. त्यामुळे विभंग निर्माण होतात. दोन्ही बाजूंचे खडक सरकतात व खडकांच्या थराची सलगता राहत नाही.

पावतात तर काही कमी प्रमाणात प्रसरण पावतात. त्यामुळे खडकांतील कणांमध्ये निर्माण होणारा ताणही कमी जास्त होतो. खडकांना तडे जातात व खडक फुटतात. ज्या प्रदेशातील दैनंदिन तापमानकक्षा खूप जास्त असते तेथे विदारण मोठया प्रमाणात होते.

**दहिवर :**

पाणी गोठल्यावर त्याचे आकारमान वाढते, ज्या प्रदेशात काही काळ तापमान $0^{\circ}C$ पेक्षा कमी असते; तेथील खडकांतील तडांमध्ये साचलेले पाणी गोठल्यावर त्याचा बर्फ होतो. आकारमान वाढते, खडकांत ताण निर्माण होतो; खडक छिन्नभिन्न होऊन फुटतात.

**रासायनिक घटकांची विद्राव्यता आणि स्फटिकांची वाढ :**

क्षारयुक्त पाण्यात खडकातील विद्राव्य घटक मिसळतात, खडकांत छोटया आकाराची छिद्रे तयार होण्यास सुरुवात होते. हा द्रवीकरणाचा परिणाम आहे. या छिद्रांत क्षारयुक्त पाणी साचते. सूर्याच्या उष्णते –मुळे या पाण्याची वाफ होऊन पाणी निघून जाते व पाण्यातील क्षारांचे स्फटिकीकरण घडून येते. स्फटिक जास्त जागा व्यापतात; त्यामुळे खडकात ताण निर्माण होतो; खडकावर छिद्रे तयार होतात. परिणामी खडकाचा पृष्ठभाग मधमाश्यांच्या पोळयासारखा दिसू लागतो.

**दाबमुक्ती :**

खडकाच्या वरच्या थराचा दाब खालच्या थरावर असतो. हा दाब नाहिसा झाल्याने खालचा थर ताणमुक्त होतो. परिणामी विदारण घडते.

**पाणी :**

काही प्रदेशांत पावसाचे प्रमाण अधिक असते. अशा प्रदेशांत केवळ पाणी मुरल्यानेही काही प्रकारच्या खडकांचे विदारण होते. उदा. वालुकाश्म, पिंडाश्म इ.

**तापमान व पाणी एकत्रितरित्या :**

तापमानभिन्नतेमुळे खडकांचे आकुंचन–प्रसरण होऊन त्यांमधील जोड किंवा तडे रुंदावतात. त्यात पाणी साचून खडकांचे मोठे खंड एकमेकांपासून बिलग होतात. या विदारणास खंड–विखंडन असे म्हणतात.

लक्ष्य करीयर
अकॅडमी

**रासायनिक विदारण :**

**कार्बनन :**

पावसाचे पाणी जमिनीवर पडेपर्यंत त्यात हवेतील $CO_2$ वायू काही प्रमाणात मिसळतो. सौम्य कार्बाम्ल तयार होते. अशा आम्लात चुनखडीसारखे पदार्थ सहज मिसळतात.

**द्रवीकरण :**

मूळ खडकातील काही खनिजे पाण्यात विरघळून पाण्याबरोबर वाहून जातात. त्यातील क्षारांपा–सून रासायनिक अवक्षेपण होऊन चुनखडी तयार होते.

**भस्मीकरण :**

लोहखनिज असते त्या खडकांवर ही क्रिया घडते. खडकांतील लोहाचा पाण्याशी संपर्क आल्या –ने लोह व $O_2$ यांत रासायनिक क्रिया घडून येते. लोहावर गंज येतो, त्यामुळे खडकावर तपकिरी रंगाचा थर तयार होतो. जास्त पावसाच्या प्रदेशात खडकांच्या बाबतीत हे घडून येते.

**जैविक विदारण :**

झाडांची मुळे वाढल्याने खडकांच्या कणांत ताण निर्माण होतो व खडक फुटतात. मुंग्या वारुळे तयार करतात. उंदीर, घुशी, ससे, कृमी कीटक जमिनीत बिळे तयार करतात. या सर्व प्राण्यांना खनक प्राणी म्हणतात. अनेकदा खडकांवर शेवाळे/हरीता, दगडफूल इ. वनस्पती वाढतात. परिणामी खडकांचे

विदारण होते.

**विस्तृत झीज :**

खडकांचे सुटे झालेले तुकडे गुरुत्वीय बलामुळे उताराच्या दिशेने सरकू लागतात व उताराच्या पायथ्याशी स्थिरावतात. विदारण प्रक्रियेतून सुटया झालेल्या कणांची हालचाल केवळ गुरुत्वीय बलाद्वारे होणे, या प्रक्रियेला 'विस्तृत झीज' म्हणतात. ही तीव्र उतारावर जलद व मंद उतारावर संथ गतीने होते.

**तीव्र गतीने होणारी विस्तृत झीज :**

परिणाम खुप विध्वंसक, तीव्र उताराच्या, दमट हवामानाच्या प्रदेशात या हालचालींची शक्यता जास्त असते. उदा. दरडी कोसळणे, भूस्सलखन जमीन खचणे.

**मंद गतीने होणारी विस्तृत झीज :**

कमी उताराच्या व सर्वसाधारण कोरडया हवामानाच्या प्रदेशात होते. माती सरकणे ही क्रिया खुपदा होते. बर्फाच्छादित प्रदेशाच्या सीमावर्ती भागात उतारावर माती मंद गतीने सरकण्यामुळे उताराला लंबरुप असे लहान लहान बांध तयार होतात. यास 'मातलोट' म्हणतात.

**खनन(अपक्षरण) :**

बाहयप्रक्रिया, वारा, वाहते पाणी, हिमनदी, सागरी जल, भूजल यांच्या कार्यामुळे घडून येते.

## ४. बाहयप्रक्रिया भाग-२

**नदीचे कार्य व भूरुपे :**

नैसर्गिकरीत्या एकत्रित झालेला पाण्याचा ओघ गुरुत्वाकर्षण शक्तीच्या प्रभावामुळे भूपृष्ठावर उताराच्या दिशेने वाहतो व स्वत:चा मार्ग आखतो. यास जलप्रवाह असे म्हणतात.

भूप्रदेशाचा उतार, खडकाचा प्रकार, नदीतून वाहणाऱ्या पाण्याचे प्रमाण व वेग, प्रवाहाची लांबी, नदीतील गाळाचे प्रमाण इ. घटकांवर नदीचे खनन, वहन व संचयनकार्य अवलंबून असते.

**नदीचे खननकार्य :**

नदीचा उगम समुद्रसपाटीपासून खूप उंचावर होतो. या ठिकाणी नदी खूप वेगाने वाहते, त्यामुळे तिची झीज करण्याची शक्ती जास्त असते. नदीच्या वेगवान प्रवाहामुळे तिच्यातील रेती, दगडगोटे यांमुळे तसेच तिला येऊन मिळणाऱ्या अनेक उपप्रवाहांमुळे नदीच्या तळाचे व काठांचे खनन होते. यामुळे घळई, V आकाराची दरी, धबधबा इ. भूरुपे निर्माण होतात.

**नदीचे वहन व संचयन कार्य :**

नदी डोंगराळ भागातून कमी उताराच्या प्रदेशात वाहत येते. पर्वताच्या पायथ्याशी उतारात बदल झाल्यामुळे नदीतील भरड गाळाचे संचयन या ठिकाणी होते. त्रिकोणी आकारात होणाऱ्या संचयनातून पंखाकृती मैदाने तयार होतात. नदीतील गाळाचे संचयन होण्यासाठी नदीची लांबी, पाण्याचे प्रमाण, नदी तील गाळाचे प्रमाण आणि भूपृष्ठाचा व नदीचा उतार इ. घटक आवश्यक असतात. अशाप्रकारे गाळाचे संचयन झाल्याने नदीपात्राच्या आजूबाजुस पूरतट, पुरमैदाने, तर मुखाकडील भागात त्रिभूज प्रदेश इ. भूरुपे तयार होतात.

**हिमनदीचे कार्य व भूरुपे :**

ज्या प्रदेशात तापमान गोठणबिंदूच्या खाली असते, अशा प्रदेशात हिमस्वरुपात वृष्टी होते. हिमाच्या प्रचंड वजनामुळे हिमथर भूपृष्ठाच्या उतारावरुन घसरु लागतो. दाब व घर्षण यांमुळे थराच्या तळाशी जमिनीलगत असलेले बर्फ वितळू लागते आणि हिमनदी संथपणे उताराच्या दिशेने सरकू लागते.

**हिमनदीचे खननकार्य :**

वेग कमी असला, तरी बर्फाचे वस्तुमान जास्त असल्यामूळे हिमनदी आपल्या तळाचे व काठाचे खननकार्य मोठया प्रमाणात करते. हिमनदीच्या खननकार्यातून हिमगव्हर, शुककूट, गिरीशृंग, U आकाराची दरी, लोंबती दरी व मेषशिला ही भूरुपे निर्माण होतात.

**हिमनदीचे वहन व संचयनकार्य :**

हिमनदी वाहताना आपल्यासोबत गाळ वाहून आणते. यास हिमोढ म्हणतात. हिमोढाचे संचयनाच्या स्थानानुसार भू–हिमोढ, पार्श्व हिमोढ, मध्य हिमोढ व अंत्य हिमोढ असे प्रकार पडतात. हिमनदीच्या संचयन कार्यातून हिमोढगिरी, हिमोढकटक इ. भूरुपे तयार होतात.

**वाऱ्याचे कार्य व भूरुपे :**

हवेच्या हालचालीस वारा म्हणतात. वारा हे वायुरुप बाहयकारक आहे. वाऱ्याचे खनन, वहन व संचयनकार्य मुख्यत: वाळवंटी व कमी पावसाच्या क्षेत्रात जास्त प्रभावीपणे आढळते. वाऱ्याबरोबर वाळूच्या कणांचे वहन होत असते. वाळूचे कण खूप दूरपर्यंत वाहून नेले जातात व ज्या ठिकाणी वाऱ्याचा वेग कमी होतो, अशा ठिकाणी वाळूचे संचयन होते.

**वाऱ्याचे खननकार्य :**

वारा आपल्याबरोबर लहान–मोठया आकाराचे वाळूचे कण, दगड इ. पदार्थ वाहून नेतो. वाऱ्याच्या मार्गातील खडकांवर हे पदार्थ घासल्याने किंवा आपटल्याने खडकांचे खनन घडून येते. यातून भूछत्र खडक, अपक्षरण खळगे, यारदांग इ. भूरुपे निर्माण होतात.

**वाऱ्याचे संचयनकार्य :**

वाऱ्याबरोबर वाहणारे वाळूचे कण निरनिराळया आकारमानाचे असतात. यातील सूक्ष्मकण खूप दूर अंतरापर्यंत वाहून नेले जातात व तुलनेने मोठे व जडकण कमी अंतरापर्यंत वाहून नेले जातात. वाळवंटी किंवा कमी पावसाच्या प्रदेशात वाळूचे संचयन होते. वाऱ्याच्या संचयनकार्यातून वाळूच्या टेकडया, बारखाण, सैफ, ऊर्मिचिन्हे, लोएस मैदान इ. निर्माण होतात.

**सागरी लाटांचे कार्य व भूरुपे :**

सागरकिनारी प्रदेशात सागरी लाटा, खनन, वहन व संचयनाचे कार्य करतात. वारा, भरती–ओहोटी यांमुळे सागरजलाची हालचाल होते. पुळणीसारख्या किनाऱ्याच्या मोकळया भागात लाटांकडून संचयन केले जाते.

**सागरी लाटांचे खननकार्य :**

लाटा किनाऱ्यावर येऊन फुटल्यानंतर पाणी व सोबत वाहून आणलेले दगड, गोटे, रेती, वाळू इ. पदार्थ जोराने किनाऱ्यावर आपटतात; त्यामुळे किनाऱ्याची झीज होते. सागरी लाटांच्या द्राविक व रासायनिक क्रियेमुळे देखील किनाऱ्याची झीज होते. या खननकार्यातून तरंगगर्षित मंच, सागरी गुहा, सागरी कडा, सागरी कमान, सागरी स्तंभ इ. भूरुपे निर्माण होतात.

लक्ष्य करीयर अकॅडमी

पडतो. पर्वत ओलांडल्यावर वाऱ्यातील बाष्पाचे प्रमाण कमी होते, तसेच हवेची बाष्प धारण क्षमता वाढते. वाऱ्याच्या विरुद्ध दिशेकडील पर्वताच्या बाजूस पावसाचे प्रमाण कमी होत जाते, या प्रदेशास पर्जन्यछायेचा प्रदेश म्हणून ओळखतात.

**आवर्त पाऊस :**

एखादया ठिकाणी हवेचा दाब आसपासच्या प्रदेशापेक्षा कमी होऊन त्यातून हवेची विशिष्ट रचना (आवर्त) तयार होते. आवर्ताचा केंद्रभागाकडे आसपासच्या प्रदेशातून हवा चक्राकार पद्ध्दतीने येऊ लागते व केंद्रभागातील हवा वर जाऊ लागते. ही हवा उंच गेल्यावर तिचे तापमान कमी होऊन हवेतील बाष्पाचे सांद्रीभवन होते व पाऊस पडतो. आवर्त ज्या प्रदेशावरुन जातात तेथे पाऊस पडतो. आवर्त पाऊस समशीतोष्ण कटिबंधात जास्त प्रमाणात पडतो. त्याचे क्षेत्र देखील विस्तीर्ण असते.

प्रतिरोध प्रकारचे प्रर्जन्य जगात सर्वात जास्त भागात पडते. आरोह पर्जन्य हा प्रादेशिक स्वरुपाचा आहे. विषुववृत्तावरील आरोह पर्जन्यात बरीच निश्चितता असते. त्यामानाने प्रतिरोध व आवर्त पर्जन्यात निश्चितता कमी असते; त्यामुळे या प्रकारच्या पर्जन्य क्षेत्रांना काही वेळेस अतिवृष्टी, पूर, अवर्षण यांसार–ख्या आपत्तींना तोंड दयावे लागते. पाऊस मोजण्यासाठी पर्जन्यमापक हे उपकरण वापरतात.

**आम्ल पाऊस :**

औदयोगिक क्षेत्रातील प्रदुषणामुळे हवेत विविध वायु मिसळले जातात. या वायूंची हवेतील बाष्पाशी रासायनिक क्रिया होऊन वेगवेगळी आम्ले तयार होतात. उदा. नायट्रीक आम्ल, सल्फ्युरीक आम्ल इ. या आम्लासह पडणाऱ्या पावसास आम्ल पर्जन्य म्हणतात.

## ६. सागरजलाचे गुणधर्म

**तापमान :**

सागरजलाचा महत्वाचा गुणधर्म, सागरजलाचे पृष्ठीय तापमान सर्वत्र समान नसते. सागरजलाचे पृष्ठीय तापमान विषुववृत्ताकडून ध्रुवाकडे कमी कमी होत जाते. विषुववृत्तीय प्रदेशात सरासरी तापमान २५° से, मध्य अक्षवृत्तीय प्रदेशात १६° से, तर ध्रुवीय प्रदेशात २° से पर्यंत असते.

या तापमानावर चक्रीवादळे, पर्जन्यमान, सागरी–लाटा, प्रवाह, क्षारता, प्रदूषण, अभिसरण, ऋतू, सागरी प्रवाह यांचा परिणाम होतो. वाढत्या खोलीनुसार सूर्याच्या उष्णतेची तीव्रता कमी होत जाते. त्यामुळे सागरजलाच्या तापमानात २००० मी. खोलीपर्यंत घट होत जाते. २००० मी. खोलीनंतर सागरजला–चे तापमान सर्वत्र सारखे आढळते. ध्रुवीय प्रदेशापासून विषुववृत्तीय प्रदेशापर्यंत ते सर्वत्र सुमारे ४° से. असते. खोलीनुसार सागरजलाचे तापमान सुमारे ४° से पर्यंतच कमी होते. त्यामुळे जास्त खोलीवर सागर–जल कधीही गोठत नाही.

विषुववृत्ताजवळ सागरजल तापमानात खोलीनुसार जास्त तर ध्रुवीय प्रदेशात तापमानातील फरक कमी असतो. भुवेष्टित समुद्रात क्षारता जास्त असल्याने येथील समुद्रजलाचे तापमान खुल्या समुद्रापेक्षा जास्त असते.

क्षारतेमुळे सागरजलाची उद्धरण क्षमता वाढते. त्याचा जलवाहतुकीसाठी फायदा होतो. मात्र सागरजलाची क्षारता प्रमाणापेक्षा जास्त असेल तर त्या पाण्यातील जीवसृष्टी नष्ट होते.

१) बाष्पीभवन जास्त आणि गोडया पाण्याचा पुरवठा कमी अशा भागात सागरजलाची क्षारता जास्त असते.

| आंतरराष्ट्रीय संघटनेचे नाव | सदस्य देशांची संख्या | मुख्यालय (देश) | उद्देश / कार्य |
|---|---|---|---|
| ब्रिक्स (BRICS) (Brazil,Russia,India, China and South Africa.) | ५ | शांघाय (चीन) | * गटातील देशांची अर्थव्यवस्था वृद्धिंगत होण्यासाठी निधी उपलब्ध करणे.<br>* परस्परांतील आर्थिक सहकार्य वाढवणे.<br>* आर्थिक सुरक्षितता मजबूत करणे. |

जेव्हा आयातीचे मूल्य हे निर्यातीच्या मूल्यापेक्षा जास्त असते, तेव्हा ते प्रतिकूल व्यापार संतुलन होय.
जेव्हा निर्यातीचे मूल्य हे आयातीच्या मूल्यापेक्षा जास्त असते, ते अनुकूल व्यापार संतुलन
जेव्हा आयात व निर्यातमूल्य जवळपास समान असते तेव्हा त्यास संतुलित व्यापार म्हणतात.



# * इयत्ता दहावी *

## २. स्थान व विस्तार

भारताचे स्थान उत्तर व पूर्व गोलार्धात आहे. आशिया खंडाच्या दक्षिण भागात हा देश आहे.

भारताचा विस्तार ४° उत्तर ते ६° उत्तर अक्षवृत्त व ७° पू ते २५° पू.रेखावृत्त आहे. भारताचे सर्वात दक्षिणेकडील टोक इंदिरा पॉईट ६°४५ उत्तर अक्षवृत्तावर आहे.

## ३. प्राकृतिक रचना व जलप्रणाली

भारताचे खालील पाच प्रमुख प्राकृतिक विभाग केले जातात.

**१) हिमालय :**

हा अर्वाचीन वली पर्वत आहे. ताजिकिस्तानमधील पामीरच्या पठारापासून हिमालय पूर्वेकडे पसरला आहे. भारतात जम्मु–काश्मीरपासून अरुणाचल प्रदेशापर्यंत हिमालय पसरला आहे.

शिवालिक ही सर्वात दक्षिणेकडील पर्वतरांग आहे. ही सर्वात नवीन (अर्वाचीन) रांग आहे. शिवा–लिक पर्वतरांगेकडून उत्तरेकडे जाताना लघु हिमालय, बृहद हिमालय (हिमाद्री) व हिमालयापलिकडील रांगा आढळतात.

याच पर्वतरांगाचे पश्चिम हिमालय (काश्मीर हिमालय), मध्य हिमालय (कुमाऊ हिमालय) व पूर्व हिमालय (आसाम हिमालय) असे भाग केले जातात.

**उत्तर भारतीय मैदान :**

हिमालयाच्या दक्षिण पायथ्यापासून भारतीय द्वीपकल्पाच्या उत्तर सीमेपर्यंत पसरलेला आहे. पश्चिमेकडे राजस्थान–पंजाबपासून पूर्वेकडे आसामपर्यंत पसरला आहे. हा भाग बहुतांशी सखल व सपाट आहे. उत्तर भारतीय मैदानाचे दोन विभाग केले जातात.

१) अरवली पर्वताच्या पूर्वेकडील भाग गंगा नदीच्या खोऱ्याचा प्रदेश असून त्यातील मैदानी भाग गंगेचे मैदान म्हणून ओळखला जातो. या प्रदेशाचा उतार पूर्वेकडे आहे. भारताच्या पश्चिम बंगाल राज्याचा बहुतांश भाग व बांग्लादेश मिळून गंगा–ब्रम्हपुत्रा प्रणालीचा त्रिभुज बनतो. हा जगातील सर्वात मोठा त्रिभूज प्रदेश आहे.

२) उत्तर भारतीय मैदानाच्या पश्चिम भागात वाळवंट आहे. हे थरचे वाळवंट किंवा मरुस्थली या नावाने प्रसिद्ध आहे. याच्या उत्तरेकडील भागास पंजाबचा मैदानी प्रदेश म्हणून ओळखतात. हा प्रदेश अरवली पर्वत व दिल्ली डोंगररांगा यांच्या पश्चिमेकडे पसरला आहे. या मैदानाची निर्मिती सतलज व तिच्या उप–नदयांच्या संचयन कार्यातून झालेली आहे. या ठिकाणचा उतार पश्चिमकडे आहे. मृदा सुपीक असल्याने येथे शेती व्यवसाय मोठया प्रमाणावर चालतो.

**द्वीपकल्प :**

उत्तर भारतीय मैदानी प्रदेशाच्या दक्षिणेकडे पसरलेला व हिंदी महासागराकडे निमुळता होत जाणारा प्रदेश म्हणजे भारतीय द्वीपकल्प. उत्तरेकडील अरवली हा सर्वात प्राचीन वली पर्वत आहे. या भागात सपाट मैदाने सीमांकित करणारी पठारांची शृंखला, मध्यभागातील विंध्य–सातपुडा पर्वत, तर पश्चिम घाट व पूर्व घाट असे पर्वतीय प्रदेश आहेत.

येऊन मिळणाऱ्या नदया यात तापी, नर्मदा, मही साबरमती इ. नदयांचा समावेश होतो.

चोल राजांनी इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात कावेरी नदीवर त्रिचनापल्ली (तिरुचिरापल्ली) शहराजवळ धरण बांधून कावेरीच्या त्रिभुज प्रदेशात जलसिंचन सुरु केले होते.

## ४. हवामान

भारताचे हवामान 'मान्सून' या प्रकारात मोडते. देशाच्या मध्यातून गेलेल्या कर्कवृत्तापर्यंत सूर्यकिरणे लंबरुप पडतात. त्यामुळे या प्रदेशात सरासरी वार्षिक तापमान अधिक असते. ते दक्षिणेकडे वाढत जाते. हिवाळयात जम्मू काश्मीर, हिमालयीन पर्वतीय क्षेत्रातील काही भागात तापमान –४०°C पेक्षाही खाली येते.

भारतीय हवामानातील वैविध्य प्रामुख्याने अक्षवृत्तीय स्थान व समुद्रसपाटीपासूनची उंची यांमुळे निर्माण झाले आहे. हिमालयामुळे उत्तरेकडून येणारे अति थंड वारे अडवले जातात, त्याचप्रमाणे नैऋत्य मोसमी वारे हिमालयाच्या शिवालिक व हिमाचल पर्वतरांगांपासून परत फिरतात. पंजाबचा मैदानी प्रदेश व राजस्थानच्या थर वाळवंटात उष्ण हवामानामुळे उन्हाळयाच्या सुरवातीला कमी दाबाचा पट्टा निर्माण होतो. त्यामुळे हिंदी महासागरातील जास्त दाबाच्या पट्टयांकडून भारताच्या मुख्य भूमीकडे वारे वाहू लागतात. या बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे भारतात पाऊस पडतो. हा पाऊस पश्चिम व पूर्व घाटांच्या अडथळयांमुळे किनारी भागात जास्त प्रमाणात पडतो.

ईशान्येकडून हे वारे हिंदी महासागराकडे परतांना द्विपकल्पाच्या काही भागात पुन्हा पर्जन्य आणतात. भारताचे एकूणच हवामान वर्षभर उष्ण असते.

कर्कवृत्त भारताच्या साधारणपणे मध्यभागातून जात असल्याने भारताला उष्णकटिबंधीय प्रदेशात गणले जाते.

## ५. नैसर्गिक वनस्पती व प्राणी

भारतात सरासरी २००० मीमी पेक्षा जास्त पर्जन्य, भरपूर सूर्यप्रकाश असलेल्या भागांत सदाहरित वने आढळतात. या वनांतील वृक्षांची पाने रुंद व हिरवीगार असतात. या झाडांचे लाकूड कठीण, जड व टिकाऊ असते. उदा. महोगनी, शिसव, रबर इ. या वनांत अनेक प्रकारच्या वेली आहेत. या वनांत सर्वाधिक जैवविविधता आढळते.

भारतात १००० ते २००० मिमी पर्जन्याच्या प्रदेशात पानझडीची वने आढळतात. कोरडया ऋतुत बाष्पीभवनाने पाणी कमी होऊ नये म्हणून वनस्पतींची पाने गळतात. उदा. साग, बांबू, वड, पिंपळ इ.

भारतात ज्या भागात दीर्घकाळ कोरडा उन्हाळा व ५०० मिमीपेक्षा कमी पर्जन्य होते, अशा प्रदेशात काटेरी व झुडपी वने आढळतात. वनस्पतींची पाने आकाराने लहान असतात. उदा. खैर, बाभूळ, खेजडी, कोरफड, घायपात.

किनाऱ्यालगत दलदलीच्या प्रदेशात, खाडया व खाजणांचा भाग असतो; तेथे क्षारयुक्त मृदा व दमट हवामान असते, अशा ठिकाणी समुद्रकाठची वने आढळतात. त्यांना सुंद्रीची वा खारफुटीची वने म्हणतात. या वनस्पतींचे लाकुड, तेलकट, टिकावू व हलके असते.

भारतीय हिमालयात उंचीनुसार वनांचे तीन प्रकार पडतात. अतिउंच प्रदेशात हंगामी फुलझाडे असणारी वने, मध्यम उंचीवरील प्रदेशात पाईन, देवदार, फर अशा सूचिपर्णी वृक्षांची वने व पायथ्यालगतची मिश्र वने आढळतात. त्यांमध्ये तसेच पानझडी वृक्ष असतात. या वनांत साल वृक्षांचे प्रमाण अधिक

**शेती :**

भारताच्या ६०% भूभाग लागवडीखाली आहे. कारणे- विस्तीर्ण मैदाने, सूपीक मृदा, अनुकूल हवामानाचा दीर्घ कालावधी, हवामानातील वैविध्य इ. भारतातील शेती मुख्यत्वे निर्वाह प्रकारची आहे. भारतात भात, गहू, ज्वारी, बाजरी, मका ही प्रमुख पिके आहेत. चहा, ऊस, कॉफी, कापूस, रबर, ताग इ. नगदी पिकेही घेतली जातात.

**मासेमारी :**

खाऱ्या व गोडया पाण्यातील मासेमारीत भारत अग्रेसर आहे. केरळ, प.बंगाल, ओडीशा, आंध्रप्रदेश, तमिळनाडू, गोवा आणि महाराष्ट्रातील किनारपट्टीच्या भागात राहणाऱ्या अनेक लोकांच्या आहारात मासे हा महत्त्वाचा घटक आहे. भारताला एकूण ७५०० किमीचा सागर किनारा लाभला आहे. मासेमारीच्या एकूण वार्षिक उत्पादनापैकी सागरी मासेमारीचा वाटा जवळपास ४०% आहे. देशाच्या एकूण मत्स्य व्यवसायापैकी सुमारे ६०% वार्षिक उत्पादन गोड्या पाण्यातील मासेमारीतून मिळते.

**खाणकाम :**

भारतातील छोटा नागपूरचे पठार खनिजांचे भांडार म्हणून ओळखले जाते. पूर्व महाराष्ट्रात व छत्तीसगढमधील कोरबा भागात कोळशाच्या खाणी आहेत. आसाममध्ये दिग्बोई, महाराष्ट्राजवळ अरबी समुद्रातील मुंबई हाय, गुजरात मध्ये कलोल, कोयाली येथे खनिज तेलाच्या विहिरी आहेत. बंगालच्या उपसागरात गोदावरी नदीच्या मुखाशी खनिज तेलाचे साठे सापडले आहेत. राजस्थानमध्ये संगमरवर, आंध्रप्रदेशात कडाप्पा या ठिकाणी दगडांच्या खाणी आहेत.

**उदयोग :**

झारखंड, ओडीशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, राजस्थानचा काही भाग तसेच कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांत धातू खनिजांचे साठे आहेत. द्वीपकल्पाच्या ईशान्य भागात धातूनिर्मितीचे उदयोग वसलेले आहेत. मुख्यत्वे लोह पोलाद उदयोग या भागात केंद्रीत झाला आहे. कारण या ठिकाणी मोठया प्रमाणात कोळश्याचे व लोहखनिजाचे साठे आहेत. दामोदर, महानदी खोऱ्यातील जलविदयुत आणि अनेक औष्णिक विदयुत केंद्रातून स्वस्त जल उर्जा व औष्णिक उर्जा मिळते. राजस्थानात तांबे, शिसे, जस्त, कर्नाटकात लोह-पोलाद, मॅगनीज, ॲल्युमिनीअम हे उदयोग विकसित झाले आहेत.

कोयाली, दिग्बोई, नूनमती, बोनगाईगाव ही तेलशुद्धीकरण केंद्रे खनिज उत्पादन करणाऱ्या प्रदेशात आहे. मथुरा आणि बरौनी ही तेलशुद्धीकरण केंद्रे किनाऱ्यापासून अंतर्गत भागात असून ती तेल उत्पादन क्षेत्रांपासून दूर आहेत. गुजरात, राजस्थान, तामिळनाडू या राज्यांमध्ये मोठया प्रमाणात मिठाचे उत्पादन होते.

**व्यापार :**

भारत प्रामुख्याने चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ, कमावलेले कातडे, कातडी वस्तु, लोहखनिज, कापूस, रेशमी कापड, आंबे इ. ची निर्यात करतो, तर खनिजतेल (पेट्रोलिअम), यंत्रसामग्री, मोती, मौल्य -वान खडे, सोने, चांदी, कागद, औषधे इ. आयात करतो. UK, USA, जर्मनी, जपान ,चीन, रशिया हे भारताचे प्रमुख भागीदार आहेत.

PERSONAL COPY
NOT FOR SALE OR CIRCULATION

ISO 9001-2015

LAKSHYA CAREER ACADEMY

**मराठी व्याकरण व शब्दसंग्रह**
**Marathi Grammer & Vocabulary**

लक्ष्य करिअर ॲकेडमी
FOR MPSC (राज्यसेवा) & PSI, STI, ASO
7887878001 / 7887878002 /groups/77926463145586
www.thelakshyaacademy.in lakshyacareeracademynashik@gmail.com
पत्ता : श्रीनाथ अपार्टमेंट, मुरकुटे लायब्ररी समोर, लेन नं.३, पंडीत कॉलनी, नाशिक-२

**इंग्रजी**
**English**

**भाषांतर व सारांशलेखन**
**Translation and synopsis writing**

**शालेय पुस्तके भाग-१**
**School books part-1**

**शालेय पुस्तके भाग-२**
**School books part-2**

**भारतीय राज्यघटना**
**Indian Constitution**

**गणित**
**Mathematics**

**बुद्धिमापन चाचणी**
**Reasoning**

**आधुनिक भारताचा इतिहास**
**Modern Indian History**

## - : लक्ष्य करिअर ॲकेडमी वैशिष्टये : -

१) पूर्व + मुख्य + मुलाखत + शारीरिक चाचणी या सर्व भागांची परिपूर्ण तयारी
२) सर्व अभ्यासक्रमाची परिक्षेआधी उजळणी
३) प्रत्येक विषयाला स्वतंत्र तज्ज्ञ मार्गदर्शक/शिक्षक
४) टेस्ट सिरीज (एकूण ४०)
५) सर्व विषयांच्या छापील नोट्स
६) वृत्तपत्र वाचनातून चालू घडामोडींची पूर्णपणे तयारी
७) CSAT (क्लास मध्ये २०० उतार्यांची तयारी)
८) बुध्दिमापन चाचणी व गणित विषयासाठी विशेष लक्ष (प्रत्येक चाप्टर वर ५० प्रश्नांची तयारी)
९) अभ्यासिका पूर्णपणे मोफत
१०) एका बॅचमध्ये फक्त ३० विद्यार्थी
११) दररोज मुख्य परीक्षेसंदर्भातील प्रश्नांचा लेखी सराव
१२) अभ्यासासाठी दर १५ दिवसांनी वैयक्तिक मार्गदर्शन